महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रूग्णालय आवार,
संकुल इमारत, १० वा मजला, ए-विंग,
मुंबई-४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-२२६१७५१०/विस्तार- २२४/२३०. Email ID :milind.kulkarni@nic.in.

---

क्रमांक : सा.आ.वि.३००११/प्र.क्र.७६४/२०१६/आ-७ दिनांक : १७.०८.२०२१

प्रति,

आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक,
राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.

**विषय :-** **सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आयुष सेवांचा दर्जा वाढविण्यासाठी तसेच कुशल सेवांचे सुसुत्रिकरण करुन संस्थात्मक संरचना तयार करण्यासाठी राज्यस्तरावर स्थापन करण्यात आलेल्या सल्लागार समितीच्या अहवालाबाबत.**

**संदर्भ :-** शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. क्र.साआवि-३००११/ प्र.क्र.७६४/२०१६/आ-७, दिनांक ०३.०१.२०१८.

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आयुष सेवांचा दर्जा वाढविण्यासाठी तसेच कुशल सेवांचे सुसुत्रिकरण करुन संस्थात्मक संरचना तयार करण्यासाठी राज्यस्तरावर सल्लागार समिती स्थापन करण्यात आली आहे.

०२. सदर समितीने केलेल्या शिफारशी सोबत जोडल्या आहेत. तरी, या अनुषंगाने आपले शिफारसनिहाय स्वयंस्पष्ट अभिप्राय सादर करण्यात यावे, ही विनंती.

**सोबत :-** वरीलप्रमाणे.

(मिलिंद कुळकर्णी)
अवर सचिव

प्रत:-

१. सहसंचालक (तांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२. निवडनस्ती (कार्यासन आरोग्य-७)

E:\Kulkarni Sir PC Backup 06.08.2021\15.04.2021\764.2016\C.R.764.2016 Letter.docx

C ५१५

आयुष

## समिती निर्धारीत सर्वसमावेशक शिफारसी

१) **सर्वस्तरीय आरोग्य संस्थांमध्ये आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) चिकित्सा सेवांचा अंतर्भाव करणे**: सर्वस्तरीय आरोग्य संस्थांमध्ये, भारतीय सार्वजनिक आरोग्य मानांकने (IPHS), राष्ट्रीय आरोग्य धोरण २०१७ (National Health Policy 2017) व मा.निती आयोगाच्या शिफारशी अनुसार आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) चिकित्सा शास्त्रांचा अंतर्भाव करणेत यावा. (उपकेंद्र स्तर ते जिल्हा रूग्णालय स्तर)

(प्रस्तावित सार्वजनिक आरोग्य - आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) चिकित्सा सेवा संरचना, जोडपत्र क्र. १ जोडली आहे.)

२) **'महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा - आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष)' / म.वै.आ.से. - आयुष या स्वतंत्र संवर्गाची निर्मिती करणे** : राष्ट्रीय आरोग्य धोरण २०१७ व निती आयोग यांच्या शिफारसी अनुसार, आरोग्य स्तर वृद्धींगत करणाऱ्या, प्रतिबंधात्मक, उपचारात्मक व आधारभूत आरोग्य सेवा प्रदान करणाऱ्या आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) चिकित्सा सेवांचा राज्यातील सर्व स्तरीय आरोग्य संस्थांमध्ये अंतर्भाव करणेकामी, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीत ''महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा- आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष)'' / म.वै.आ.से. - आयुष या स्वतंत्र संवर्गाची निर्मिती करण्यात यावी. व उपरोक्त संवर्गाचा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आकृतीबंधामध्ये समावेश करण्यात यावा. (उपरोक्त नियोजित महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा - आयुष संवर्ग संरचना अनुसार एकूण ३९९५ वैद्यकीय अधिकारी यांची पदे प्रस्तावित करण्यात येत आहेत. पैकी २०४६ आयुर्वेद, १४०९ होमिओपॅथीक, ५४० युनानी व ३१० योग व निर्सगोपचार पदवीधाकर यांचेकरीता पदे प्रस्तावित करण्यात येत आहेत.)

३) **सार्वजनिक आरोग्य विभाग, आरोग्य सेवा संचालनालय यांचे अखत्यारीत स्वतंत्र आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) प्रशासकीय संरचना कार्यान्वित करणे :** राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेमधील सद्यस्थितीस सेवारत व नव्याने प्रस्तावित अशा एकूण सर्व आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) चिकित्सा संवर्ग (स्थायी, अस्थायी, कंत्राटी) यांचे व्यवस्थापन, सनियंत्रण, मूल्यांकन, सुसूत्रिकरण व सबलीकरण करणे कामी तत्कालिक /अल्प कालावधीमध्ये, सार्वजनिक आरोग्य विभाग, आरोग्य सेवा संचालनालयाच्या अखत्यारित, स्वयंपूर्ण, स्वतंत्र प्रशासकीय संवर्गाची निर्मिती करण्यात यावी. व उपरोक्त संवर्गाचा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आकृतीबंधामध्ये समावेश करण्यात यावा. (सदर नियोजित आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) प्रशासकीय संरचने अनुसार एकूण ८४ वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांची पदे प्रस्तावित करण्यात येत आहे. व पैकी संचालक १, सह संचालक १, उपसंचालक १३, सहसंचालक ३४ व जिल्हा आयुष अधिकारी ३५, यांचेकरिता पदे प्रस्तावित करण्यात येत आहेत.)

(प्रस्तावित सार्वजनिक आरोग्य सेवा - आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) प्रशासकीय संवर्ग संरचना, जोडपत्रे क्र.२ मध्ये जोडलेली आहे.)

४) **प्रस्तावित सार्वजनिक आरोग्य सेवा - आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) प्रशासकीय संवर्ग संरचनेद्वारे, राज्यांतील आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष)चिकित्सा संवर्गाकरिता पदोन्नतीच्या संधी उपलब्ध करून देण्यात याव्यात** : राज्य सार्वजनिक आरोग्य विभागात सद्यस्थितीस कार्यरत व नियोजित ''मवैआसे-आयुष'' संवर्गातील वैद्यकीय अधिकारी यांना

उपकेंद्र स्तर ते संचालनालय स्तर, पदोन्नतीच्या संधी उपलब्ध करून देणेकामी, नविन पदोन्नतीच्या मार्गदर्शक सूचना शासनाद्वारे निर्धारत केल्या जाव्यात. व उपरोक्त पदोन्नती संरचनेचा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आकृतिबंधामध्ये समावेश करण्यात यावा.

(प्रस्तावित सार्वजनिक आरोग्य सेवा - आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) प्रशासकीय संवर्ग पदोन्नती संरचना जोडपत्र क्र. ३ मध्ये जोडलेली आहे).

५) **प्रस्तावित 'महाराष्ट्र वैद्यकिय आरोग्य सेवा-आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष)' संवर्गासाठी नवीन सेवा प्रवेश नियम गठित करण्यात यावेत** : उपरोक्त उल्लेखित ''महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा - आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष)'' तसेच भविष्यातील प्रस्तावित ''आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) - विशेषज्ञ'' व ''आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) - प्रशासकीय संवर्ग'' या सर्व संवर्गातील वैद्यकीय अधिकारी यांचे नियुक्तीकरिता, नवीन सेवा प्रवेश नियम निर्धारित करण्यात यावेत.

(केंद्रीय आयुष मंत्रालयाद्वारे निर्धारित सेवा प्रवेश नियमांवर आधारीत व राज्य शासकीय सेवेच्या अनुरूप योग्य ते बदल करून, नवीन सेवा प्रवेश नियम गठित करण्यात यावेत).

६) **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, आरोग्य सेवा संचालनालय द्वारे सद्यस्थितीस कार्यरत सर्व आयुर्वेद पदवीधर वैद्यकीय अधिकारी संवर्गांचे ''म.वै.आ.से. गट-अ'' या एकाच संवर्गात समावेशन करण्यात यावे** : राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील सद्यस्थितीस गट-अ व गट-ब संवर्गातील, वेगवेगळ्या पदांवरील सेवारत आयुर्वेद पदवीधारक वैद्यकीय अधिकारी यांचे ''मवैआसे राजपत्रीत गट-अ'', या एकाच संवर्गामध्ये परावर्तन करण्यात यावे व भविष्यातील प्रस्तावित सार्वजनिक आरोग्य- आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) चिकित्सा सेवा संरचना मध्ये देखील सर्व आयुष वैद्यकीय अधिकारी यांचा गट-अ या एकाच संवर्गामध्ये अंतर्भाव करण्यात यावा.

७) **सार्वजनिक आरोग्य सेवेतील सद्यस्थितीतील कार्यरत, आयुर्वेद पदवीधर वैद्यकीय अधिकारी यांना इतर समकक्ष आधुनिक चिकित्सा अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी यांचे प्रमाणे नैसर्गिक न्याय तत्वाने, समान संधी व लाभ देण्यात यावेत**: राज्यातील सार्वजनिक आरोग्य तथा कुटुंब कल्याण विभाग, आरोग्य सेवा संचालनालयाच्या अखत्यारीत, सद्यस्थितीस सेवारत आयुर्वेद पदवीधर वैद्यकीय अधिकारी यांना इतर समकक्ष आधुनिक चिकीत्सा अर्हताधारक वैद्यकिय अधिकारी यांचे प्रमाणे समान काम, समान वेतन, समान संधी या नैसर्गिक न्याय तत्वास अनुसरून समान लाभ प्रदान करण्यात यावेत. जसे की,

१. पदव्युत्तर पदवी / पदविका अर्हताधारक आयुर्वेद वैद्यकीय अधिकारी यांना इत्तर समकक्ष आधुनिक चिकित्सा अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी यांचेप्रमाणे "म वै आ से – आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) विशेष तज्ञ" असा स्वतंत्र संवर्ग उपलब्ध करून देण्यात यावा.

२. सार्वजनिक आरोग्य सेवेतील सद्यस्थितीस सेवारत, सर्व संवर्गातील आयुर्वेद पदवीधर वैद्यकीय अधिकारी, यांना १२/२४ वर्षांच्या सुधारित आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ देण्यात यावा.

३. पदव्युत्तर पदवी तसेच पदविका अर्हताधारक आयुर्वेद वैद्यकीय अधिकारी यांना, इत्तर समकक्ष आधुनिक चिकित्सा अर्हताधारक पदवीधर वैद्यकीय अधिकारी यांचे प्रमाणे ६/३ अतिरिक्त विशेष वेतनवाढी देण्यात याव्यात.

८) **सार्वजनिक आरोग्य विभाग, आरोग्य सेवा संचालनालय व राष्ट्रीय आरोग्य अभियानद्वारे राबविण्यात येणाऱ्या सर्व आरोग्य कार्यक्रम / योजना यामधील कंत्राटी पदांचे वेतन समान असावे. त्या अनुषंगाने**

**सद्यस्थितीत कार्यरत सर्व कंत्राटी आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) चिकित्सा अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी यांना, इत्तर समकक्ष आधुनिक चिकित्सा अर्हता धारक वैद्यकीय अधिकारी यांचेप्रमाणे समान वेतन अदा करण्यात यावे व भविष्यातील प्रस्तावित सर्वस्तरीय आरोग्य संस्थांमधील, ''सार्वजनिक आरोग्य – आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) चिकीत्सा सेवा संरचनेमधील'' स्थायी / नियमित पदांच्या नियुक्ति प्रक्रियेमध्ये प्राधान्य देण्यात यावे :**

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, आरोग्य सेवा संचालनालय व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत व आदिवासी विकास विभागाच्या नवसंजीवनी योजने अंतर्गत, वेगवेगळ्या कार्यक्रमांद्वारे अस्थायी तथा कंत्राटी पदस्थापनेवर कार्यरत आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) चिकित्सा अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी यांना कंत्राटी आस्थापनेवर कार्यरत असेपर्यंत, इतर समकक्ष आधुनिक चिकित्सा अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी यांचेप्रमाणे, समान वेतन अदा करण्यात यावे. (संदर्भ - मा. सचिव, आयुर्वेद, योग व प्राकृतिक चिकित्सा, युनानी व होमिंओपथि (आयुष) मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. Z 28015/04/2018- H&D Cel, दिनांक- 27 - 02 - 2018)

तसेच भविष्यात प्रस्तावित सर्वस्तरीय आरोग्य संस्थांमधील आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) चिकित्सा सेवांचा अंतर्भाव करतांना, प्रस्तावित स्थायी/नियमित पदांच्या नियुक्ती प्रक्रियेमध्ये, उपरोक्त कंत्राटी आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी वैद्यकीय अधिकारी यांच्या आजवरच्या समर्पित सेवा विचारात घेता, त्यांना प्राधान्य देण्यात यावे.

९) सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) चिकित्सा अर्हता धारक वैद्यकीय अधिकारी यांना मा. निती आयोग व राष्ट्रीय आरोग्य धोरण २०१७ यांचे शिफारसी अनुसार, इत्तर समकक्ष आधुनिक चिकीत्सा अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी यांचेप्रमाणे, प्राथमिक आरोग्य सेवांबाबत तसेच राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम व राष्ट्रीय व्याधी विकार नियंत्रण कार्यक्रम याबाबत प्रशिक्षण देण्यात यावे.

१०) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, आयुष संचालनालय यांचे अखत्यारीत कार्यरत आयुर्वेद विस्तार अधिकारी या संवर्गाचे, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग यांचेकडे हस्तांतरण करण्यात यावे.

११) राज्यातील प्रस्थापित आयुर्वेद व युनानी दवाखाने यांचे वेतन, वेतनादि बाबी, अनुदान निर्धारण व पर्यवेक्षण तथा सनियंत्रण ह्यांबाबतचे दायित्व/जबाबदारी, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, आरोग्य सेवा संचालनालय यांचे अखत्यारीत प्रस्तावित आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) प्रशासकीय संवर्गाकडे सोपविण्यात यावे.

१२) राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाचे अखत्यारीतील उपलब्ध आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) चिकित्सा प्रणालींच्या पायाभूत सुविधा जसे की शासकीय आयुष रूग्णालये, दवाखाने व सोई सुविधा ह्यांचे बळकटीकरण केले जावे तसेच सदर आयुष पायाभुत सुविधा – संसाधन व एकूण आयुष मानव संसाधन यांचा, राष्ट्रीय व्याधी विकार नियंत्रण कार्यक्रम व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या पूर्ण क्षमतेने अंमलबजावणीसाठी व ग्रामीण तथा शहरी भागातील गरजू जनसंख्येला प्राथमिक आरोग्य सुविधा पुरविणेकामी सुयोग्य वापर करण्यात यावा.

१३) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, आरोग्य सेवा संचालनालय यांचे अखत्यारित, राज्यातील प्रत्येक जिल्हा मुख्यालयी आयुष रूग्णालयांची स्थापना केली जावी. (राष्ट्रीय आयुष अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार).

१४) प्रस्थापित सार्वजनिक आरोग्य संरचनेतील धोरणात्मक निर्णय प्रक्रिया राबविणारे वरिष्ठ, तांत्रिक / अतांत्रिक व प्रशासकीय संवर्गातील सन्माननिय अधिकारी (संचालनालय स्तर ते जिल्हास्तर) तसेच परा-वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी व परिचर्या संवर्ग तसेच आशा, बहुउद्देशीय आरोग्य कार्यकर्ता यांचेकरिता '' आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) चिकित्सा सेवांबाबत संवेदीकरण प्रशिक्षण'' वर्गाचे नियोजन करण्यात यावे.

१५) आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) चिकित्सा सेवांच्या सार्वजनिक आरोग्य यंत्रणेच्या मुख्य प्रवाहामधील समावेशनाद्वारे, आधुनिक चिकित्सा व आयुष चिकित्सा यांचे अंतर्गत उपचार घेणाऱ्या रूग्णांना, संतर्भित / प्रतिसंदर्भित (Referal / Cross Referral) उपचार सेवा तसेच संयुक्त (Integrative) उपचार सेवा देण्यात याव्यात व त्यायोगे आंतर-चिकीत्सा संशोधनाकरीता उभय चिकीत्सा प्रणाली वैद्यकांना प्रशिक्षित व प्रोत्साहीत करण्यात यावे.

१६) राष्ट्रीय आयुष अभियानाची पूर्ण क्षमतेने प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी.

१७) सर्व स्तरीय आरोग्य संस्थांमध्ये दर्जात्मक आयुर्वेद, युनानी व होमिओपॅथी (आयुष) औषधींचा, सुयोग्य प्रमाणात पुरवठा करण्यात यावा.

१८) आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) चिकित्सा सेवांची पूर्ण क्षमतेने प्रभावी अंमलबजावणी व प्रचार/प्रसार यांचेकरीता आवश्यक आर्थिक तरतूद करण्यात यावी.

१९) 'शासकीय माहिती व जनसंपर्क यंत्रणा' यांचेद्वारे आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) चिकित्सा सेवांचा प्रतिबंधात्मक व आरोग्य संवर्धनी आयाम, स्वस्थ जीवनशैली, संतुलित आहार या बाबत जन प्रबोधन करण्यात यावे व सदर यंत्रणा यांना उपरोक्त चिकित्साशास्त्रांच्या प्रचार, प्रसार करणेकामी प्रोत्साहीत करण्यात यावे.

२०) उपरोक्त उल्लेखित सर्व शिफारसी तथा प्रस्तावित सर्वस्तरीय आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) चिकीत्सा सेवा संरचना कार्यान्वित करणेकामी, सार्वजनिक आरोग्य विभाग, आरोग्य सेवा संचालनालय यांचे अखत्यारीतील सद्यस्थितीत रिक्त असलेल्या पदांपैकी काही पदे ही प्रस्तावित ''महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा - आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी (आयुष) प्रशासकीय संवर्ग" या मधील राज्य, विभाग व जिल्हा स्तरीय पदांमध्ये परावर्तीत करण्यात यावीत. तसेच सदर पदांवर प्रचलित आरोग्य सेवा संरचनेमधील स्थायी स्वरुपात कार्यरत आयुर्वेद पदवीधर वैद्यकीय अधिकारी यांना पदोन्नतीद्वारे पदस्थापना देण्यात याव्यात.